सकाळ



आजरा : संजीवनी सावंत यांचा सत्कार करताना सुरेखा भालेराव, एम. एल. चौगुले, शिवशंकर उपासे, व्ही. के. मायदेव, डॉ. आर. एस. निळपणकर.

# उपनगराध्यक्ष सावंत यांचा 'रवळनाथ'तर्फे सत्कार

आजरा, ता. २४ : आजरा नगरपंचायतीच्या नूतन उपनगराध्यक्षा संजीवनी संजय सावंत यांचा रवळनाथ हौसिंग फायनान्सतर्फे सत्कार झाला. आजरा शाखा सल्लागार सुरेखा भालेराव यांच्या हस्ते सावंत यांना स्मृतिचिन्ह देण्यात आले. संस्थापक संचालक प्रा. डॉ. शिवशंकर उपासे अध्यक्षस्थानी होते. येथील संस्थेच्या कार्यालयात कार्यक्रम झाला. आजरा महाविद्यालयाचे निवृत्त उपप्राचार्य प्रा. राजीव टोपले यांचा सत्कार डॉ. उपासे यांच्या हस्ते झाला. या वेळी प्रा. डॉ. उपासे, डॉ. नवनाथ शिंदे, प्रा. टोपले यांचे भाषण झाले. उपाध्यक्ष प्रा. व्ही. के. मायदेव, संचालक प्राचार्य डॉ. आर. एस. निळपणकर, मुख्य कार्यकारी अधिकारी डी. के. मायदेव, संजय सावंत, शाखाधिकारी संभाजी हरेर व कर्मचारी उपस्थित होते. शाखा अध्यक्ष प्रा. डॉ. विनायक आजगेकर यांनी स्वागत केले. संस्थापक एम. एल. चौगुले यांनी प्रास्ताविक केले. नूरजहाँ सोलापुरे यांनी सूत्रसंचालन केले.

Kolhapur, Gadhinglaj-Today
25/03/2022 Page No. 3